“संत नामदेव आणि संत तुकाराम यांच्या अभंगातील सामाजिकता व बुद्धिप्रामाण्य : एक तौलनिक अभ्यास ”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी करीतासादर करावयाचा

संशोधन आराखडा

: संशोधक :

रोडगे संभाजी हरिभाऊ

एम.ए.,मराठी,(सेट)एम.एड.

: : मार्गदर्शक : :

डॉ. धोंडगे पंढरीनाथ नारायण

सहयोगी प्राध्यापक,

ज्ञानोपासक महाविद्यालय, जिंतूर, जि.परभणी

वर्ष - २०१९

प्रस्तावना :

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. मध्ययुगीन महाराष्ट्रातील अध:पतित होत चाललेल्या धार्मिक व सामाजिक जीवनाला योग्य मार्ग दाखवण्याचे कार्य ज्या पंथाने केले तो पंथ वा संप्रदाय म्हणजे वारकरी संप्रदाय होय. या संप्रदायाचे प्रवर्तक व प्रेरणास्थान म्हणजे संत नामदेव व संत ज्ञानेश्वर होत. यांनी तत्कालिन वैदिक धर्मातील कर्मठता, पढिक पांडित्य व यज्ञयागाचे अवडंबर झुगारून आठरापगड जातीच्या लोकांना, अबालवृद्धांना वारकरी पंथाच्या झेंड्याखाली एकत्र आणले. या संत परंपरेतील एकत्र आलेल्यात प्रामुख्याने संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत गोरा कुंभार, संत चोखामेळा, संत जनाबाई, संत नरहरी सोनार, सावता माळी, संत एकनाथ, संत तुकाराम इत्यादी संतांचा समावेश होतो. या संत मालिकेतील संतांनी आपल्या अभंगातून आध्यात्माची उकल करणारे विचारमंथन मांडले. त्यांचे हे समाजशिक्षणाचे, प्रबोधनाचे कार्य आधुनिक काळातही कीर्तन, भजन, प्रवचन याद्वारे चालूच आहे. हा वारसा आधुनिक काळातील संत गाडगे महाराज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्यापासून ते आजघडीच्या कीर्तनकारांनी जपलेला दिसून येतो.

वारकरी संप्रदायातील अनेक संतांनी केलेल्या कार्याचे, विचारांचे तत्कालिन सामाजिक परिवर्तनात महत्त्वपूर्ण असे योगदान आहे. संतांनी आपल्या या कार्यासाठी अभंगनिर्मिती हे महत्त्वाचे साधन वापरले. आपल्या अभंगाद्वारे लोकांना सद्सद्विवेक, सामाजिक भान, नीती, उपदेश, समाजातील अंधश्रद्धा, वाईट प्रथा इत्यादीवर दाखले, दृष्टांत हे अत्यंत सोप्या, मधुर लोकभाषेत मांडून तत्कालिन समाजात वैचारिक जागृती घडवून लोकांना विवेकवादी व डोळसवृत्तीने जगण्याचा मार्ग सांगितला आहे.

वारकरी संप्रदायाचे प्रवर्तक असलेले संत नामदेव आणि वारकरी संप्रदायरूपी मंदिराचा कळस असलेले संत तुकाराम यांच्या अभंगाची अजूनही मोठमोठ्या विद्वानांना व ज्ञानपंडितांना भूरळ पडतेच आहे. संत नामदेवांनी जवळपास अडीच हजार अभंग रचना केली. संत तुकाराम यांच्या नावे चार हजार अभंग आहेत. या दोन्ही संतांचा कार्यकाळ भिन्न आहे. त्याबरोबरच ते ज्या काळात अभंग लिहित होते तो काळ आणि तत्कालिन सामाजिक परिस्थिती पूर्णत: वेगवेगळी असली तरी त्यातून व्यक्त होणारे विचार, दृष्टिकोन, उद्देश, तळमळ ही बहुतांशी एकच आहे. दोहोंनी व्यक्त केलेले विचार आजही तितकेच महत्त्वाचे ठरतात. त्यांच्या अभंगातून विविध विषयांसंदर्भात विचार जरी व्यक्त होत असले; तरी संत नामदेव व संत तुकाराम यांच्या अभंगातून व्यक्त होणारी सामाजिकता व बुद्धिप्रामाण्य यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी हे संशोधन हाती घेतले आहे.

विषय निवडीची भूमिका :-

मध्ययुगीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत महाराष्ट्रातील आठरापगड जातीच्या लोकांना, अबालवृद्धांना भक्तीच्या झेंड्याखाली ज्या पंथाने एकत्र आणले त्या वारकरी पंथ वा संप्रदायाविषयी मला लहानपणापासूनच आकर्षण आहे. माझे बालपण याच संप्रदायिकांच्या सहवासात गेल्यामुळे मला संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत जनाबाई, संत तुकाराम आदी संताच्या अभंगाविषयी ओढ निर्माण झाली. आठरापगड जातीच्या लोकांना, स्त्री-पुरूष, अबालवृद्ध, श्रेष्ठ - कनिष्ठ, गरीब - श्रीमंत असा भेद न मानता सर्वांना समजेल अशी भाषा, सर्वांना परवडेल असा देव(विठ्ठल) आणि देव व भक्त यांच्यात कसल्याही प्रकारची मध्यस्थी असणार नाही अशा वारकरी संप्रदायाविषयी अधिक सखोल अभ्यास मांडायला हवा असे मला नेहमीच वाटत होते. त्यातल्यात्यात या वारकरी संप्रदायाचे प्रवर्तक असलेले संत नामदेव आणि या पंथाच्या मंदिराचा कळस झालेले संत तुकाराम यांच्या अभंगरचनेत कोणकोणत्या गोष्टीत साम्य - भेद आढळून येतात. त्यांच्या अभंग रचनेवर तत्कालिन सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक घटकांचा प्रभाव आहे का? याचा तुलनात्मक अभ्यास अधिक संशोधक वृत्तीने व्हावा या हेतूने मी या विषयाकडे अभ्यास करण्यास प्रवृत्त झालो.

संत वाङ्मय, संत नामदेव, संत तुकाराम यांच्या अभंगरचनेवर आतापर्यंत अनेक अभ्यासकांनी विचार मांडलेले आहेत. परंतु, संत नामदेव व संत तुकाराम दोहोंच्या अभंगरचनेचा तौलनिक अभ्यास विशेषत: त्यांच्या अभंगरचनेतील सामाजिकता व बुद्धिप्रामाण्य यांचा तौलनिक दृष्टीकोनातून विचार झालेला दिसत नाही. म्हणून मी काहीसा दुर्लक्षित राहिलेला विषय माझ्या पीएच.डी. संशोधनासाठी निवडला आहे. संत नामदेव व त्यांचाच वारसा चालवणारे संत तुकाराम यांच्या अभंगरचनेतील सामाजिकता व बुद्धिप्रामाण्यता यात साम्य - भेद आढळून येते का याचे यथायोग्य दर्शन व्हावे या हेतूने मी **संत नामदेव आणि संत तुकाराम यांच्या अभंगरचनेतील सामाजिकता व बुद्धिप्रामाण्य : एक तौलनिक अभ्यास** हा विषय पीएच.डी. साठी निवडला आहे. सदर विषय निवडण्यामागची दुसरी महत्त्वाची भूमिका म्हणजे आतापर्यंत शालेय स्तर, पदवी व पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांना या दोन्ही संतांच्या अभंगातील रचना या बहुतांश प्रमाणात भक्ती, नाममाहात्म्य, विठ्ठलमहिमा, संतसंगती आदी दृष्टीकोन समोर ठेऊनच मांडलेली दिसून येते. यामुळे यांच्या अभंगातील काही बाजू दुर्लक्षित राहिल्या. त्यातील एक बाजू सामाजिकता व बुद्धिप्रामाण्य आणि दुसरी बाजू म्हणजे तुलनात्मक अभ्यास या अंगानेही अभ्यासकांची सोय व्हावी म्हणून त्यांच्या अभंगाचे चिकित्सक लेखन करण्यासाठी हा विषय निवडला आहे.

संशोधन विधान :-

‘‘संत नामदेव आणि संत तुकाराम यांच्या अभंगातील सामाजिकता व बुद्धिप्रामाण्य : एक तौलनिक अभ्यास ’’

संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

- संत नामदेव आणि संत तुकाराम यांच्या वाङ्‌मयीन व्यक्तिमत्त्वाचा शोध घेणे.
- संत नामदेव आणि संत तुकाराम यांच्या अभंगातील सामाजिकतेचा शोध घेणे.
- संत नामदेव आणि संत तुकाराम यांच्या अभंगात असलेली बुद्धिप्रामाण्यता याचा शोध घेणे.
- संत नामदेव आणि संत तुकाराम यांच्या अभंगात आलेली सामाजिकता व बुद्धिप्रामाण्यता यातील साम्य भेद मांडण्याचा प्रयत्न करणे.
- संत नामदेव आणि संत तुकाराम यांच्या अभंगात असलेली सामाजिकतेचा व बुद्धिप्रामाण्यतेचा तुलनात्मक पद्धतीने शोध घेणे.
- संत नामदेव आणि संत तुकाराम यांच्या अभंगरचनेत व्यक्त होणाऱ्या विवेकवादी विचारांचा सामाजिक अंगाने शोध घेणे.

गृहितके :-

- संत नामदेव आणि संत तुकाराम यांच्या वाङ्‌मयीन व्यक्तिमत्त्वाची तुलनात्मक ओळख मांडली आहे.
- संत नामदेव आणि संत तुकाराम यांचे अनेक अभंग सामाजिक चिंतन व सामाजिक विचार व्यक्त करणारे आहेत.
- संत नामदेव आणि संत तुकाराम यांच्या अनेक अभंगातून बुद्धिप्रामाण्यवादी, विवेकवादी विचार व्यक्त होतो.
- सामाजिक सुधारणा, वैज्ञानिक दृष्टीकोन, विवेकवादी विचार इत्यादींच्या प्रसारासाठी संत नामदेव आणि संत तुकाराम यांच्या अभंग वाङ्‌मयाचा चांगला उपयोग होऊ शकतो.
- आजच्या सामाजिक परिस्थितीतही संत नामदेव आणि संत तुकाराम यांचे सामाजिक व बुद्धिप्रामाण्यवादी विचार लागू पडतात.
- संत नामदेव आणि संत तुकारामांच्या अभंगातील तौलनिक अभ्यासाद्वारे त्यांच्या अभंगातील साम्य भेद स्थळे अभ्यासता येतात.

संशोधनाची व्याप्ती व संशोधनाची मर्यादा :-

प्रस्तुत संशोधन हे संत नामदेव आणि संत तुकाराम यांची अभंगरचना, अभंगगाथा व तदनुषंगाने उपलब्ध असणाऱ्या साहित्यापुरतेच व्याप्त असुन त्यांच्या एकूण अभंगरचनेत व्यक्त होणारी सामाजिकता आणि बुद्धिप्रामाण्यवादी विचार असणाऱ्या अभंगाचा यात समावेश केला जाणार आहे.

प्रस्तुत संशोधन हे संत नामदेव आणि संत तुकाराम यांच्या अभंगरचनेपुरतेच मर्यादित असून त्यातील व्यक्त होणाऱ्या सामाजिक व बुद्धिप्रामाण्यवादी अभंगरचनेपुरतेच मर्यादित आहेत. या दोहोंच्या अभंगात आलेला सामाजिक, विवेकवादी, बुद्धिप्रामाण्यवादी विचारसरणीचा तुलनात्मक दृष्टीकोनातून अभ्यास केला जाणार आहे.

संशोधन पद्धती :-

‘संत नामदेव आणि संत तुकाराम यांच्या अभंगातील सामाजिकता व बुद्धिप्रामाण्य : एक तौलनिक अभ्यास’ या विषयाला अनुसरुन जी प्रकरणे निश्चित केली आहेत. त्या प्रकरणांचा संशोधनात्मक पातळीवर विचार करणे क्रमप्राप्त ठरते. दोहोंच्या अभंगात अवतरलेले सामाजिक चिंतन आणि बुद्धिप्रामाण्यवादी विचार तौलनिकदृष्ट्या मांडताना अनेक विद्वान,अभ्यासकांचा विचार, विश्लेषणात्मक ग्रंथ, समीक्षात्मक ग्रंथ आदींचा संदर्भ लक्षात घेतला जाणार आहे. म्हणून प्रस्तुत संशोधनासाठी संदर्भीय संशोधन पद्धतीचा उपयोग केला जाणार आहे.

संशोधनाची साधने :-

सदर संशोधनासाठी संदर्भ साधने म्हणून पूर्वसुरींची मते, अनेक विद्वान अभ्यासकांनी लिहलेल्या ग्रंथाचा आधार घेतलेला आहे. संत नामदेव यांच्या अभंगाचा अभ्यास करण्यासाठी ‘संत नामदेवांची गाथा’(महाराष्ट्र सरकारचे प्रकाशन, एकूण अभंग- २३३७), ‘संत नामदेव:चरित्र, काव्य आणि कार्य’(महाराष्ट्र सरकारचे प्रकाशन) या दोन ग्रंथ प्रती प्रमाणभूत म्हणून आधाराला घेतली आहे. तसेच, संत तुकारामांच्या अभंगाचा अभ्यास करण्यासाठी ‘संत तुकारामबावांच्या अभंगाची गाथा’ ही महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ यांनी प्रकाशित केलेली प्रत संदर्भासाठी प्रमाणभूत म्हणून आधाराला घेतली आहे. याबरोबरच वारकरी संप्रदायासंदर्भात सखोल माहिती असलेले संदर्भग्रंथ, त्या संदर्भाने केलेले लेखन, संशोधन साहित्य इत्यादींचा वापर केला जाणार आहे. तसेच,

कीर्तनकार, शिक्षण तज्ज्ञ मंडळी, विचारवंत, वाचक, यांच्या मुलाखती चर्चाद्वारे माहिती मिळविण्यात येणार आहे.

कार्यवाहीचे टप्पे :-

प्रथमत: संशोधन समस्येचा शोध घेऊन त्या संशोधनाची गरज, महत्त्व, समस्या विधान, संशोधनाची उद्दीष्ट्ये, गृहितके, मर्यादांची मांडणी करणे. त्यानंतर संबंधीत साहित्याचा आढावा घेणे, संशोधनासाठी निवडलेल्या पद्धतीनुसार माहिती साधनाच्या संदर्भात संशोधन, अर्थ निर्वचन, विश्लेषण करून प्राप्त माहितीचे वर्गीकरण करणे, तुलनात्मक मांडणी करणे आणि शेवटी निष्कर्ष मांडणे, शिफारशी व पुढील संशोधनासाठी विषय सुचविणे.

प्रकरण योजना/प्रकरणांची विभागणी :-

प्रकरण पहिले : विषय प्रवेश किंवा प्रस्तावना

या प्रकरणात वारकरी संप्रदाय, संत वाङ्‌मय, अभंग: एक वाङ्‌मय प्रकार, संत नामदेव व संत तुकाराम अभंगाची परंपरा, रचना याबरोबरच तौलनिक साहित्य म्हणजे काय? त्या अनुषंगाने संत नामदेव व संत तुकाराम यांच्या अभंगाचा तुलनात्मक आभ्यास यात केला जाईल.

प्रकरण दुसरे : संत नामदेव व संत तुकाराम यांचे वाङ्‌मयीन व्यक्तिमत्त्व

या प्रकरणात संत नामदेव व संत तुकाराम यांचा परिचय, तत्कालिन सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थिती, संत नामदेव व संत तुकाराम यांच्या अभंगाचे स्वरूप, प्रेरणास्त्रोत, प्रभाव, त्यांच्या अभंगवाणीतून प्रतिबिंबित झालेले व्यक्तिमत्त्व, व्यक्त झालेला विचार इत्यादी संदर्भात अभ्यास या प्रकरणात केला जाईल.

प्रकरण तिसरे : संत नामदेव व संत तुकाराम यांच्या अभंगातील सामाजिकता

या प्रकरणात संत नामदेव व संत तुकाराम यांच्या अभंगवाणीतील सामाजिक जीवन दर्शनाचा वेध घेण्याच्या प्रयत्न केला जाईल. त्यांच्या अभंगवाणीतून प्रतिबिंबित झालेले तत्कालिन सामाजिक जीवन, कुटुंबव्यवस्था, वर्ण-वर्ग व्यवस्था, सामाजिक नीतीनियम, रूढी, परंपरा, संकेत यांचे दर्शन धर्म पंथ, सांस्कृतिक जीवन यांचे चित्रण आदी संदर्भात अभ्यास केला जाईल.

प्रकरण चौथे : संत नामदेव व संत तुकाराम यांच्या अभंगातील बुद्धिप्रामाण्य

या प्रकरणात बुद्धिप्रामाण्य म्हणजे काय? बुद्धिप्रामाण्य वाद आहे की वैचारिक दृष्टिकोन, विवेकवाद आणि बुद्धिप्रामाण्य यात काय साम्य आहे आदी विचार केला जाईल तसेच, संत नामदेव व संत तुकाराम यांच्या अभंगाद्वारे अभिव्यक्त कसे झाले? याचा विचार केला जाईल. संत नामदेव व संत तुकाराम यांच्या अभंगवाणीतून बुद्धिप्रामाण्यवादी विचार व्यक्त होतात का? ते कसे? याचा विचार केला जाईल तसेच, संत नामदेव व संत तुकाराम यांच्या अभंगवाणीद्वारे अभिव्यक्त झालेला वैज्ञानिक दृष्टिकोन,विवेकवादी विचार ते विविध दृष्टांत, दाखले, उदाहरणाद्वारे कशा पद्धतीने आलेला आहे. इत्यादी संदर्भात विचार प्रस्तुत प्रकरणात करावयाचा आहे.

प्रकरण पाचवे : संत नामदेव व संत तुकाराम यांच्या अभंगाचे तुलनात्मक विवेचन

प्रस्तुत प्रकरणाद्वारे संत तुकाराम आणि संत नामदेव यांच्या अभंगवाणीत असणारी साम्य स्थळे, त्यांच्या अभंगवाणीत अभिव्यक्त झालेल्या विचारातील वैविध्यता, संत नामदेवाची सामाजिकता व बुद्धिप्रामाण्यता आणि संत तुकाराम यांच्या अभंगात अभिव्यक्त झालेली सामाजिकता व बुद्धिप्रामाण्य यातील साम्यभेद, दाखले, दृष्टांत, अभिव्यक्तीची शैली इत्यादींचे तुलनात्मक विवेचन प्रस्तुत प्रकरणाद्वारे करण्यात येईल.

प्रकरण सहावे : उपसंहार व निष्कर्ष

प्रस्तुत प्रकरणात वरील संशोधन आराखड्याप्रमाणे संशोधन करून या आधारावर निष्कर्ष मांडण्यात येतील.

प्रस्तुत संशोधन आराखडा हा प्राथमिक स्वरूपाचा असून भविष्यात यामध्ये काही बदल करणे आवश्यक वाटल्यास तसा बदल करण्यात येईल.

संदर्भग्रंथ सूची

१. **संत नामदेवाची गाथा**, महाराष्ट्र सरकारचे प्रकाशन, मुंबई.

२. डॉ. शं.दा.पेंडसे, **महाराष्ट्राचा भागवतधर्म ज्ञानदेव आणि नामदेव**, कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे.

३. **श्री नामदेव: चरित्र, कला आणि कार्य**, महाराष्ट्र सरकारचे प्रकाशन,मुंबई.

४. लाड पुरुषोत्तम मंगेश(संपा.),**श्री तुकारामबावांच्या अभंगाचीगाथा**, गव्हमेंट सेंट्रल प्रेस, मुंबई, १९५५.

५. नेऊरगांवकर स.के., **श्री तुकाराम महाराजांची सार्थ गाथा**, वरदा प्रकाशन,पुणे, १९९८.

६. आजगांवकर ज.र., **संतश्रेष्ठ तुकाराम**, मंगेश कुलकर्णी (प्रका.),मुंबई,१९३९.

७. गोसावी र.रा.,**श्री तुकाराम महाराज चरित्र**, सारथी प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती,१९९८.

८. जोशी प्र.न., **मराठी वाङ्‌मयाचा विवेचक इतिहास**,(प्राचीन काळ) प्रसाद प्रकाशन पुणे,१९७८.

९. नेमाडे भालचंद्र, **तुकाराम**, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९८.

१०. साळुंखे आ.ह., **विद्रोही तुकाराम**, सदाशिव बागाईतकर स्मृतिमाला,पुणे,१९९७.

११. डॉ. आनंद पाटील, **तौलनिक साहित्य: नवे सिद्धांत आणि उपयोजन**, साकेत प्रकाशन,पुणे.

१२. डॉ. भिंताडे वि.रा., **शैक्षणिक संशोधन पद्धती**, नित्यनूतन प्रकाशन,पुणे,२००६.

१३. प्राचार्य डॉ. के.यु. घोरमोडे, **शैक्षणिक संशोधनाची मुलतत्त्वे**,२००८.

१४.विष्णु बुवा जोग महाराज, **सार्थ श्री तुकारामाची गाथा**, केशव भिकाजी ढवळे प्रकाशन, मुंबई,१९०९

१५.डॉ.पी.ए.आहिरे, **शैक्षणिक संशोधन पद्धती**, अथर्व पब्लिकेशन्स्,जळगांव.

: संशोधक :

रोडगे संभाजी हरिभाऊ

एम.ए.,मराठी,(सेट) एम.एड.

:: मार्गदर्शक ::

डॉ. धोंडगे पंढरीनाथ नारायण

सहयोगी प्राध्यापक,

ज्ञानोपासक महाविद्यालय, जिंतूर, जि.परभणी